# प्रेसनोट दि. २१/१२/२०१७

## गुन्हे शाखे कडील वाहनचोरी विरोधी पथकाकडून ट्रक चोरणारे वाहनचोर गजाआड व गुन्हयातील ०४ ट्रक हस्तगत.

---

हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.१२१०/२०१७, भा.द.वि.क. ३७९,३४ मधील फिर्यादी तेजस्विनी मंगेश साळवेकर, वय-२९, धंदा-नोकरी, रा. बावधान, पुणे या मंडल अधिकारी, हडपसर, पुणे येथे कार्यरत असून त्यांनी व तहसीलदार हवेली श्री. प्रशांत पिसाळ, त्यांचे स्टाफसह अनधिकृत खनिज वाहतुकीवर कारवाई करीत असताना ट्रक नंबर (१) एम.एच.१२/के.आर/५५०८, (२) एम.एच.१२/एच.बी./५५०८, (३) एम.एच.१२/एम.व्ही./९९५६, (४) एम.एच.१२/एन.बी./७५७८, ही वाहने बेकायदेशीर वाळूने भरलेली असताना मिळून आल्याने ते कायदेशीरित्या ताब्यात घेऊन मांजरी द्राक्ष बागायतदार संघ, मांजरी फार्म येथे संरक्षणकामी पार्क करुन ठेवलेल्या असताना त्या चोरुन नेलेल्या आहेत. वगैरे मजकुरची फिर्याद दाखल आहे.

दाखल गुन्हयातील चोरीस गेलेल्या ०४ ट्रक बाबत पोलीस उप-निरीक्षक उत्तम बुदगुडे व पो.हवा. ४६८३ अब्दुलकरीम सय्यद यांचे मिळालेले बातमी वरुन गुन्हयातील ०४ ट्रक हे आरोपी नामे १) अशोक निवृत्ती वाघमारे, वय-२२, धंदा-ड्रायव्हर, रा. कुंजीरवाडी, पुणे २) अमोल अशोक पोंधे, वय-२५, धंदा-ड्रायव्हर, रा. कवडीपाठ, टोलनाका, हडपसर, पुणे यांना पकडून त्यांचे ताब्यातील वरील **किंमत रुपये १७,२१,६००/- रु. (सतरा लाख एकवीस हजार सहाशे रुपये) चे ०४ ट्रक काळभोर लॉन्स मंगल कार्यालय, वाक वस्ती, कवडीपाठ, पुणे-सोलापूर हायवे रोड, पुणे** येथून जप्त करण्यात आलेले आहेत. व पुढील कार्यवाही करीता आरोपी व मुद्देमालसह हडपसर पोलीस स्टेशनला दिलेले आहेत.

सदरची कारवाई श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, पोलीस उप-आयुक्त श्री. पंकज डहाणे, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. संजय निकम, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वाहनचोरी विरोधी पथकाचे पोलीस उप-निरीक्षक, उत्तम बुदगुडे, नागेश भोसले, स.पो.फौ. राजु वांबुरे, पो.हवा. अब्दुलकरीम सय्यद, तुकाराम नाळे, सुहास कदम, हनुमंत बोराटे, विशाल शिर्के यांनी केलेली आहे.


Bisleri